# नगर परिषद वणी

(नियम क्र. ६.१.१ ( महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व ६९ आणि महाराष्ट्र नगर परिषद नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये )

## बांधकाम परवाना मंजुरी (अधिकृत)

प्रति, सौ प्रिया अभिनव भास्करवार
वणी,वणी

विषय:- बांधकाम परवाना (प्राथमिक) मंजुरी ( अधिकृत ) मंजुरी देणेबाबत.
संदर्भ: - 1.अर्ज क्र. -- 15517092900008 अर्ज दि. -- 29/09/2017
2. नगर अभियंता यांचा दिनांक ______________ रोजीचा अभिप्राय.

महाशय,
आपण खालील ठिकाणी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम १८९ अन्वये व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४/६९ अन्वये विकास कार्य करण्यासाठी बांधकाम परवाना मिळण्यासाठी दिनांक 29/09/2017 रोजी केलेल्या अर्जास अनुसरून या खालील व पाठीमागे दिलेल्या शर्ती व अटीस पात्र राहून आणि या सोबतच्या बांधकाम नकाशावर लाल रंगाने दर्शविलेल्या सुधारण्यास पात्र राहून आपणास हे प्रारंभ प्रमाणपत्र म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार हा बांधकाम परवाना BPA\00041\2017-18 देणेत येत आहे.

बांधकाम तपशील : निवासी वापरासाठी (766.92 चौ.मि.).

### बांधकामाच्या जागेचे वर्णन

| | | | |
|---|---|---|---|
| मौजा / सि.स.नं. | :- 18A | त.सा.क्र. / स.नं. (सर्व्हे नं.) | :- |
| प्लाट क्र. / ख.क्र./ भूखंड क्र./ विभाग | :- नगर रचना स्किम १ | प्लॉट क्र. | :- 39 |
| रस्ता/प्रभाग क्र./ मोहल्ला | :- | शहर | :- वणी |
| | | हिस्सा क्र./ घर क्र. | :- |
| प्लॉटचे क्षेत्रफळ | :- 6510.62 चौ.मि. | | |
| बांधकामाचे क्षेत्रफळ | :- 766.92 चौ.मि. | | |

खास शर्ती / अटीवर

1. या लेआऊट मधील रस्त्याचे व मो-यांचे बांधकाम लेआऊट धारकाकडुन करुन घेणे आवश्यक राहील. नगर परिषद रस्त्याचे व मो-याचेबांधकाम करुन देणार नाही
2. वणी नगर परिषदेच्या अनुज्ञप्तीयधारक अभियंत्याच्या पर्यवेक्षणाखाली बांधकाम करणे आवश्यक राहील. बांधकाम पुर्ण झाल्यानवर अभियंता कडुन योग्यरता प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक राहील तसेच पूर्णतः प्रमाणपत्र , नगर परिषदे कडून सादर करुन परिषदेचे नाहरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय इमारतीचा उपयोग करता येणार नाही.
3. वणी शहरासाठी लागु असलेल्या इमारत बांधकाम उपविधी व विकास नियंत्रण नियमांचे पालन करणे आपणांवर बंधनकारक राहील.
4. हे प्रमाणपत्र दिल्याचे तारखेपासुन एक वर्ष वैध असेल परंतु नगर रचना विभागाने किंवा इतर बाबींमुळे सदरचे प्रमाणपत्रास हरकत घेतल्याखस किंवा काही दुरुस्तीं दर्शविल्यास सदरचे बांधकाम प्रमाणपत्र रद्द झाले असे समजण्यात येईल.
5. सदरहु बांधकामामुळे नगर परिषदेच्या विकास योजनेत जर अन्य कोणत्याही सार्वजनिक कार्यात अडथळे निर्माण झाल्यास बांधकाम तुमच्या खर्चाने काढुन घ्यावे लागेल त्यावर नगर परिषदे द्वारे कोणतीही भरपाई मिळणार नाही.
6. बांधकाम मंजुर केलेल्या नकाशाप्रमाणे आणि ठरवुन दिलेल्या अटीप्रमाणे करावे.
7. भुखंडाचे बाजुचे हद्दीनुसार आणि मागील बाजुने नकाशात दर्शविल्याप्रमाणे सिमांकित अंतर सोडावे.
8. लेआऊट टाकल्यासनंतर खोदकामापुर्वी नगर परिषद सक्षम अधिका-याकडुन तपासणी झाल्याशिवाय व तसे प्रमाणपत्र दिल्या शिवाय खोदकाम करु नये.

Scanned by CamScanner

ई-गव्हर्नन्स

(नियम क्र. ६.१.१ ( महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व ६९ आणि महाराष्ट्र नगर परिषद नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये )

9. बांधकाम परवानी प्रमाणे प्लिंथ / जोत्याचे काम नगर परिषदेकडुन तपासणी झाल्याशिवाय पुढील बांधकाम करु नये
10. अर्जदारास मंजुर नकाशा व्यकतिरीक्त त्यात फेरबदल करावयाचे असल्यास नगर परिषद ची पुर्व मंजुरी घेणे आवश्यक राहील.सेप्टीक संडासाच्या व्हेवटीलेशन पाईपची उंची स्वनताःच्या शेजारी घराच्या उंची पेक्षा ३ मिटर उंच ठेवावी व्हेयटीलेशन पाईपच्या तोंडाला डास प्रतिबंधक जाळी लावावी सेप्टीक टँकचे बांधकाम लगतचे पाणी पुरवठा स्त्रोतापासुन ( उदा विहीर बोअरवेल पासून ) कमीत कमी ७.0 मिटर अंतर सोडुनच करावे तसेच सिमांकन भिंत बांधकाम करतांना दर्शनी रोडचे पातळीपासुन २.0 मिटरपेक्षा जास्त उंच बांधकाम करता येणार नाही.
11. मा. जिल्हाकधिकारी, यवतमाळ यांचेकडुन अकृपक वापराची परवानगी घेण्याची जवाबदारी तुमचेवर राहील तशी परवानगी घेवुन बांधकाम करावे अन्यंथा ही परवानगी रद्द समजावी.
12. ज्या जागेवर बांधकम करावयाचे आहे त्या जागेसंबंधीचा कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास त्यासंबंधीची सर्व जबाबदारी तुमचेवर राहील.
13. बांधकामाचे साहित्यस सार्वजनिक रस्त्यावर नगर परिषदेच्या लेखी परवानगी शिवाय ठेवु नये तसे आढळुन आल्यास कार्यवाही करण्यात येईल.
14. भुखंडाचे क्षेत्रापेक्षा जास्त् जागेत कोणत्यारही प्रकारचे बांधकाम करु नये.
15. रस्याच्या पातळीपासून इमारतीच्या पायव्याची उंची दोन फुटापेक्षा कमी नसावी.
16. बांधलेल्या जागेत भरपुर हवा सुर्यप्रकाश व स्वच्छता राहील यावावतची योग्य खबरदारी घ्यावी.
17. बांधकाम पक्या स्वरुपाचे असावे तसेच बांधकामात हलक्या स्वरुपाचे सामान गवत इत्यादीचा वापर करु नये.
18. ज्या जागेत इमारतीचा नकाशा मंजुर केला असेल त्या ठिकाणी जनावरांचा गोठा बांधु नये.
19. इमारतीचे सांडपाणी इतरत्र न सोडता नगर पालिकेची गटारे असल्यास त्या गटारात नालीद्वारे सोडण्यात यावे तसेच सार्वजनिक गटार नसल्यास स्वतःच्या मालकीच्या जागेत सोकपिट बांधुन योग्य व्यवस्था करावी.
20. मंजुर बांधकामाचा उपयोग फक्त निवासासाठी / दुकानासाठी / कारखान्यासाठी / पिठगिरणी या प्रयोजनासाठीच करावा.
21. ही बांधकाम परवानगी मंजूरीच्या दिनांकापासून एक वर्षापर्यंत अंमलात राहील बांधकाम पूर्ण न झाल्यास व परवानगीची मुदत वाढवुन न घेतल्यास ही परवानगी रद्द झाली असे समजण्यांत येईल.
22. मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम करावे या व्यतिरीक्त जास्तीचे बांधकाम अथवा कोणताही फेरबदल केल्यांचे निदर्शनास आल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ तसेच महाराष्ट्र नगर पालिका नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील तरतूदीप्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल.
23. बांधकाम पुर्ण झाल्यावर नगर परिषदेकडुन बांधकाम पुर्णत्वाचा दाखला घेतल्या शिवाय बांधकामाचा वापर सुरु करु नये . तसे आढळुन आल्यास महाराष्ट्र नगर पालिका अधिनियम १९६५ च्या तरतूदीप्रमाणे कार्यवाही करण्यांयत येईल.
24. कोणत्याही स्थितीत काम बंद करण्याचा किंवा सुरु ठेवण्याचा अधिकार नगर परिषदेने राखुन ठेवला आहे.
25. जोत्याचे बांधकाम पूर्ण झाल्याय नंतर परिषदेला सूचना देवुन झालेला बांधकाम मंजूर नकाशा प्रमाणे नसल्यास दिलेली बांधकाम परवानगी रद्द करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.
26. सदरहु भुखंडावर कमीतकमी ५ झाडे लावुन ती जतन करावी त्याशिवाय बांधलेल्या जागेचा वापर सुरु करण्याची परवानगी दिली जाणार नाही.
27. तांत्रिकदृष्टया सदर वास्तुची बांधणी भुकंप अवरोधक करण्यांत यावी या बाबतीत तांत्रिक सुपरव्हिजन घेवुन काम करुन घेण्याचे अटीवर परवानगी प्रदान करण्यांत येते.
28. राष्ट्रीय प्रमुख महामार्गावरील बांधकाम करण्यारपुर्वी सा. बांधकाम विभगाची परवानगी घेणे अनिवार्य राहील.
29. सदर बांधकाम करतेवेळी रेन वॉटर हार्वेस्टिंग ( पावसाचे छतावरील पाणी जमिनीत शोषण पद्धतीने जिरविणे ) करणे बंधनकारक राहील.
30. महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाच्या परिपत्रक क्रमांक - संकिर्ण २००१ / प्र/ क्र.४१०/२००१/४ दिनांक २३ मे २००१ नुसार आपणांस भारतीय मानक ब्युरोच्या मापदंडाप्रमाणे घराचे बांधकामास भुकंपरोधक उपाययोजना करणे बंधनकारक राहील तसेच यासाठी मान्यणताप्राप्त अभियंता यांचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
31. महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचे पत्र क्र.डी.सी.आर–१०९४/२९२९/नवि-११ दि.१८ नोव्हेंबर २००४ अन्वये सौर उर्जेवर तापविणारी यंत्रणा निर्माण करणे आपणांवर बंधनकारक राहील

Scanned by CamScanner

नगर परिषद वणी

(नियम क्र. ६.१.१ ( महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व ६९ आणि
महाराष्ट्र नगर परिषद नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये )

२. वरिष्ठ प्राधिकरणाकडुन अथवा मा. सहसंचालक यांचेकडुन काही आदेश प्राप्त झाल्यास त्याचे पालन करणे बंधनकारक राहील.

३. बांधकाम हे सोबतच्या आराखड्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे घरगुती एकूण......166.92...... चौ. मि. पेक्षा जास्त करु नये.

४. नगर परिषदेने यापुर्वी तळमजल्याच्या बांधकामास दिलेल्या परवानगीच्या आधारावर प्रस्तावित पहिल्या मजल्याच्या बांधकामाचे नकाशानुसार परवानगी देण्यांत येत आहे.

5. इतर सौ. प्रिया अभिनव भास्करवार मंजुर नकाशापेक्षा जास्त काम केल्यास परवानगी रद्द समजण्यात येईल

6. वरीलपैकी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास दिलेली परवानगी रद्द करण्यांत येईल याबाबत आपला कोणतीही उजर ऐकुण घेतल्यां जाणार नाही व आपणांस परवानगी नुसार पुढील बांधकाम करता येणार नाही याची स्पष्ट जाणीव करुन देण्यांत येत आहे तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ मधिल तरतूनदीप्रमाणे कायदेशिर कार्यवाही करण्यांत येईल.

6. नविन DCR नियम लागू राहतील

6. वरिष्ठ प्राधिकरणाकडून आक्षेप आल्यास परवानगी रद्द समजण्यात येईल

प्रमाणे परवाना दिला असे ,

बांधकाम परवाना क्रमांक द. नं. :- BPA\00041\2017-18

दिनांक :- जा. क्र. 1089 दि. 29/9/17

प्रत माहितीसाठी
कर निर्धारण अधिकारी
नगर परिषद वणी

मुख्याधिकारी
नगर परिषद वणी

वेहित नमुन्यात महानगरपालिकेत अर्ज

Scanned by CamScanner